12-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/11/2025 10:24 PM Page 1



मडगाव फेस्तातून ३० लाखांचे उत्पन्न » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



३२४ विकेट्स घेणाऱ्या भारताच्या खेळाडूंची मोठी घोषणा » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, १२ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 280 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 12 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### भारतीयांच्या जन्मदरात लक्षणीय घट

**नवी दिल्ली, दि. ११ :** संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार १४६ कोटी लोकसंख्येच्या भारताच्या जन्मदरात मागील काही वर्षांमध्ये सातत्याने घट होऊ लागली आहे. आता भारताचा जन्मदर १.९ टक्के एवढा कमी झाला आहे. याचा अर्थात भारतात एक महिला दोन किंवा त्यापेक्षा कमी मुलांना जन्म देत आहे. किमान २.१ टक्के जन्मदर असेल अर्थात प्रत्येक महिला किमान दोन मुलांना जन्म देत असेल तर संबंधित देशाच्या नव्या पिढ्या जन्माला येणे आणि त्यांनी उज्वल भविष्यासाठी काम करणे हे प्रत्यक्षात घडू शकते. पण जन्मदर १.९ असेल तर नव्या पिढ्या निर्माण होण्याच्या प्रमाणातच घट होईल. यामुळेच ही चिंतेची बाब असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जन्मदरात घट होण्याची प्रक्रिया अशीच पुढे सुरू राहिली तर आणखी काही दशकांनी भारतापुढे गंभीर आव्हानं निर्माण होण्याची शक्यता आहे.
संयुक्त राष्ट्रांनी जगातील १४ देशांचा आढावा घेतला. प्रत्येक देशाची लकसंख्या, तिथला जन्मदर अशी अनेक माहिती संकलित करण्यात आली. प्रत्येक देशातील नागरिकांशी चर्चा करुन त्यांचे पुढल्या पिढीला जन्म देण्याबाबतचे मत जाणून घेण्यात आले. यातूनच जन्मदरातील वाढ आणि घटीची प्रमुख कारणे समजली आहेत. भारतात जन्मदर १.९ टक्के एवढा कमी होण्याची काही प्रमुख कारणे आहेत. ही कारणे संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातून हाती आली आहेत.

----------------

### मस्क यांनी ट्रम्प यांची मागितली माफी

**वॉशिंग्टन, दि. ११ :** टेस्लाचे प्रमुख एलन मस्क यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची माफी मागितली आहे. त्यांनी बुधवारी सोशल मीडिया पोस्टमध्ये आपली चूक मान्य केली आहे. मस्क यांनी याबद्दल एक्स वर पोस्ट केली आहे. मस्क यांनी त्यांच्या मागील काही पोस्टमध्ये ट्रम्प यांच्या विधानांचे आणि धोरणांचे समर्थन केले आहे. लॉस एंजेलिसमधील बेकायदेशीर स्थलांतरितांवर टाकलेल्या छाप्यांबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. याआधी एका मुलाखतीत, जेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना मस्कबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांनी अतिशय शांत स्वरात उत्तर दिले. ट्रम्प म्हणाले, आमचे नाते चांगले होते आणि मी त्यांना शुभेच्छा देतो. ट्रम्प यांचे हे विधान सोशल मीडियावर व्हायरल झाले. एलन मस्क यांनी यासंबंधीच्या एका व्हिडिओवर 'लाल हृदय' इमोजीची कमेंट केली. मस्क यांनी ट्रम्प यांच्याविरुद्धच्या त्यांच्या काही जुन्या पोस्ट आधीच डिलीट केल्या आहेत.

----------------

### अमेरिका हिंसा; २५ शहरांमध्ये निदर्शने

**वॉशिंग्टन, दि. ११ :** अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये ५ दिवसांपासून सुरू असलेल्या निदर्शनांमुळे संध्याकाळी ६ नंतर कर्फ्यू लागू करण्यात आला आहे. लॉस एंजेलिसच्या महापौर करेन बास यांनी आणीबाणी जाहीर केली आहे. त्याच वेळी, मंगळवारी रात्री ८ वाजल्यापासून ते बुधवारी (स्थानिक वेळेनुसार) संध्याकाळी ६ वाजेपर्यंत लॉस एंजेलिसच्या काही भागात कर्फ्यू लागू करण्यात आला. सोमवारी, हे निदर्शने अमेरिकेतील १२ राज्यांमधील २५ शहरांमध्ये पसरली होती. सॅन फ्रान्सिस्को, डलास, ऑस्टिन, टेक्सास आणि न्यू यॉर्क सारख्या अमेरिकन शहरांमध्ये शांततापूर्ण निदर्शने झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी ट्रम्प यांनी मंगळवारी ४ हजार नॅशनल गार्ड्र्सह ७०० मरीन कमांडो लॉस एंजेलिसला पाठवले होते. सोमवार-मंगळवार रोजी लॉस एंजेलिस पोलिसांनी १,१०० हून अधिक निदर्शकांना अटक केली. लॉस एंजेलिसमध्ये हिंसाचार सुरूच राहिला तर ते संपूर्ण शहरात बंडखोरी कायदा लागू करू शकतात असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. हा कायदा सरकारला हिंसाचार थांबवण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याची परवानगी देतो.

# गोवा वारसा धोरण २०२५ ला अधिकृत मंजुरी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ११ : राज्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्य मंत्रिमंडळाने 'गोवा राज्य वारसा धोरण २०२५' ला अधिकृत मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बुधवारी ही माहिती दिली.**

या धोरणाचा उद्देश २०० हून अधिक ऐतिहासिक, पुरातत्त्वीय आणि सांस्कृतिक वारसा स्थळांचे तसेच सुमारे १०० खासगी आणि सरकारी मालकीच्या वारसा इमारतींचे संरक्षण व संवर्धन करणे आहे. डिसेंबर २०२४ मध्ये या धोरणाचा मसुदा सार्वजनिक करण्यात आला होता. यामध्ये खासगी मालकांना आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या तरतुदी आहेत. याशिवाय, पर्यटन विकासाच्या दृष्टीने वारसा स्थळांचा अनुकूल पुनर्वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. धोरणात १४ मुख्य क्षेत्रांचा समावेश आहे,

पान २ ▶

### इतर मंत्रिमंडळ निर्णय

- **मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, वन हक्क दाव्यांशी संबंधित सर्वेक्षणाचे काम अर्धवट राहिल्यामुळे नवीन सर्वेक्षकाची नियुक्ती करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्याचबरोबर पुढील निर्णयांनाही मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे.**
- **चिंबेल येथे उभारण्यात येणाऱ्या 'युनिटी मॉल'च्या कामासाठी ऑर्डर मंजूर.**
- **डिझायनर ट्रॉय कोस्टा यांची इटलीतील 'नमस्ते इंडिया' कार्यक्रमात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड.**
- **वाघेरी (सत्तरी) व साखळी- सांगे येथे दोन नवीन ४ जी टॉवर्स बसवण्यास मंजुरी.**
- **मांद्रे ग्रामपंचायतीसाठी स्मशानभूमीच्या २ हजार चौ. मीटर जागेची ओळख.**
- **१९ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व ४ ईएनटी सर्जन यांची नियुक्ती.**






## अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार; दोघांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आगशी पोलिसांनी पर्वरी येथील दोन तरुणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अल्ताफ मुजावर (१९) आणि ओम नाईक (२१) अशी आहेत.

ही कारवाई रविवारी (८ जून) पीडित मुलींच्या बेपत्ता होण्याच्या तक्रारीनंतर सुरू झालेल्या तपासाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित मुली (वय १३ ते १५) आणि त्यांच्यासोबतची आणखी एक अल्पवयीन मैत्रीण, वाढदिवस साजरा करण्यासाठी कळंगुट येथे पुरुष मित्रांसोबत गेल्या होत्या.

पीडितांच्या पालकांनी शनिवारी (७ जून) त्यांच्या मुली बेपत्ता झाल्याची तक्रार आगशी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. त्याच दिवशी एका इतर महिलेने देखील तिची ११ वर्षीय मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. तपास अधिकाऱ्यांना संशय होता की ती मुलगी देखील या गटात सामील असावी.

पीएसआय दीपीका पवार, पीएसआय ऋषिकेश रायकर, पोलिस कॉन्स्टेबल राजू अत्तार आणि महिला कॉन्स्टेबल सुवर्णा नार्वे यांच्या पथकाने तांत्रिक आणि मानवी गुप्त माहितीच्या आधारे तपास पुढे नेला. तपासादरम्यान पोलिसांनी कळंगुटमधील एका हॉटेलमध्ये तिन्ही अल्पवयीन मुलींना शोधून काढले. त्या वेळी आरोपी अल्ताफ आणि ओम हॉटेलमध्ये उपस्थित होते. दोघांनाही घटनास्थळीच अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान असे स्पष्ट झाले की, आरोपींनी दोन वेगवेगळ्या हॉटेल खोल्यांमध्ये चेक-इन केले होते. पीडित मुलींना बांबोळीम येथील पीडित सहाय्यता युनिटकडे नेण्यात आले. त्यांच्या जबाबात लैंगिक अत्याचार झाल्याचे उघड झाले. या प्रकरणात आगशी पोलिस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत:

गुन्हा क्र. ३०/२०२५: गोवा बाल कायदा २००५ अंतर्गत कलम १३७(२), ६४(१), ७४, ७५ (१) बीएनएस आणि पोक्सो कायदा अंतर्गत कलम ४, ८, १२ आणि गुन्हा क्र. ३१/२०२५: गोवा बाल कायदा २००५ अंतर्गत कलम १३७ (२), ६४(१), ७४ बीएनएस आणि पोक्सो कायदा अंतर्गत कलम ४, ८, १२ असे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास एलपीएसआय दीपिका पवार आणि पीएसआय ऋषिकेश रायकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. संपूर्ण तपास पीआय अनंत गावकर, एसडीपीओ पणजी सुदेश नाईक आणि उत्तर गोवा पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

## ढवळीतील भंगारअड्ड्यांमुळे आगीच्या संकटाची चाहूल

### स्थानिक ग्रामस्थांचा संताप | विध्वंस पथक राबवण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ११ :** बेकायदेशीर भंगारअड्ड्यांमुळे आगीचे गंभीर संकट ओढवू शकते त्यामुळे असे भंगार अड्डे तातडीने उद्ध्वस्त करावेत अशी तीव्र मागणी ढवळीतील संतप्त ग्रामस्थांनी केली आहे. या कवळे पंचायतीने ग्रामस्थांच्या तक्रारींवर आधारित विशेष बैठक घेतली. यावेळी गावकरी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५ मे २०२३ रोजी ढवळी येथे भंगारकामात लागलेल्या भीषण आगीच्या आठवणी अजूनही ताज्या असताना, आज दोन वर्षांनंतर पुन्हा एकदा तोच परिसर टिकिंग टाईम बॉम्ब' बनला आहे. बेकायदेशीर भंगार कामांची संख्या झपाट्याने वाढत असून, त्यात धोकादायक



कचरा, प्लास्टिक, टायर, रसायनांचे बॅरल्स, अगदी स्फोटक पदार्थही भरलेले आढळून येत आहेत. त्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी कडक कारवाईची मागणी केली आहे.

ग्रामस्थांनी पंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि उपजिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विध्वंस पथकाची तातडीने स्थापना करण्याची मागणी केली आहे. कारण महामार्गाच्या बाजूला असलेली बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्यासाठी सीमारेषा स्पष्ट करणे गरजेचे असल्याचे ते सांगतात.

भंगार कामे केवळ वाढत नाहीत, तर ती प्रचंड प्रमाणात धोकादायक स्वरूप धारण करत असल्याचा आरोप ग्रामस्थ संजय ढवळीकर यांनी केला. त्यांनी सांगितले की, भंगारकामांच्या नावाखाली उद्योगधंद्यांचे अड्डे, बेकायदेशीर खोल्यांचे बांधकाम, आणि स्थानिक जमिनीचे व्यावसायिक वापर वाढला आहे. ५ मे २०२३ रोजी झालेल्या आगीत संपूर्ण महामार्ग बंद पडला होता आणि शेकडो नागरिकांना धोका निर्माण झाला होता. त्यानंतरही काहीही धडा न घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ढवळीकर यांनी पंचायत आणि वन विभागाला आपल्या जमिनीची पाहणी करण्याची मागणी केली, कारण अनेक जागांवर नव्याने अतिक्रमण झाले आहे. एक वर्षापूर्वी उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हटवलेली सात अतिक्रमणे पुन्हा उभी राहिल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

पान २ ▶

## कोविडचा सौम्य पुनरुदय : आरोग्य विभाग सतर्क

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** राज्यात सलग पाच दिवस कोविड रुग्णांची नोंद शून्यावर राहिल्यानंतर मंगळवारी मडगाव येथील दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात पुन्हा एक पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आला आहे. राज्याचे साथीचे रोगतज्ज्ञ डॉ. उत्कर्ष बेतोडकर यांनी ही माहिती दिली असून, सदर रुग्णाबाबतची सविस्तर माहिती मात्र अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

रुग्णालयात मंगळवारी करण्यात आलेल्या १४ नमुन्यांपैकी एका नमुन्याचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. यासह राज्यातील सध्या सक्रिय रुग्णांची संख्या सहावर पोहोचली आहे. सर्व रुग्ण सौम्य स्वरूपाचे आहेत, घाबरण्याचे कोणतेही कारण नाही, असे डॉ. बेतोडकर यांनी स्पष्ट केले.

कोरोनाव्हायरस आता हंगामी फ्लूसारख्या पद्धतीने परत येत असल्याचे निरीक्षण डॉ. बेतोडकर यांनी नोंदवले. तो फक्त फ्लूसारखा होतो आहे. जोपर्यंत मोठा उत्परिवर्तन होत नाही, तोपर्यंत परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता नाही. हवामान बदलामुळे एकाच वेळी अनेक विषाणू सक्रिय असतात. त्यामुळे थोडा त्रास जाणवू शकतो, असे त्यांनी सांगितले.

डॉ. बेतोडकर यांच्या म्हणण्यानुसार, सध्या भारतभर डॉक्टर विषाणूचा डीएनए तपासत आहेत आणि चिंतेचे काहीही दिसून आलेले नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या गोंधळाची गरज नसल्याचे ते पुन्हा एकदा ठामपणे सांगतात.

साथ अधिकृतपणे संपुष्टात आल्याची घोषणा झाल्यानंतरही राज्यात कोविडवरील पाळत ठेवण्याची प्रक्रिया सुरूच आहे. सध्या आम्हाला दर ३ ते ४ दिवसांत एक रुग्ण सापडतो, आणि ही प्रकरणे ओपीडी किंवा घरगुती व्यवस्थापनात हाताळली जात आहेत, असे डॉ. बेतोडकर यांनी सांगितले.

तसेच, सर्व रुग्णालयांना ताप, श्वसन विकार, किंवा अस्पष्ट कारणाने आजारी पडलेल्या रुग्णांची कोविडसह डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया यांसाठी तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जर कोविड वाढत असेल, तर त्याचा पहिला परिणाम उच्च-जोखीम गटांवरच होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यात मधुमेह, दमा किंवा इतर श्वसन विकार असलेले तसेच वृद्ध व बालरुग्ण यांचा समावेश आहे.


पान २ ▶

## गोव्यातील खारफुटींना वाढता धोका; सरकारचा नवा आराखडा

### सात प्रमुख नदीमुखे धोक्यात | बेकायदेशीर भू-संपादन, वृक्षतोड, जलप्रदूषणामुळे खारफुटीचा लोप

■ कार्स्टन मिरांडा
टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** गोव्यातील किनारी खारफुटी क्षेत्र मानव अतिक्रमण, प्रदूषण, हवामान बदल आणि कायदेशीर कमकुवतीमुळे धोक्याच्या झोनमध्ये गेले आहे. पर्यावरण व हवामान बदल विभागाने नुकत्याच जाहीर केलेल्या व्यवस्थापन आराखड्यात या संकटाकडे लक्ष वेधण्यात आले आहे आणि संरक्षणासाठी बहुआयामी उपाय सुचवण्यात आले आहेत. या आराखड्यानुसार, खारफुटी क्षेत्राच्या आकडेवारीतच प्रचंड तफावत आहे. वन विभागाने केवळ २६ चौ. कि.मी. क्षेत्र नोंदवले असताना, राष्ट्रीय शाश्वत तटीय व्यवस्थापन केंद्राच्या २०१६च्या



पाहणीनुसार हे क्षेत्र ४१ चौ. कि.मी. होते. या फरकामुळे डेटा अद्ययावत करण्यासाठी जीआयएस आणि ड्रोन-आधारित तंत्रज्ञानाचा वापर सुचवण्यात आला आहे. आराखड्यात मांडवी – झूआरी, तेरेखोल, शापोरा, साळ, तळपण आणि गालजीबागसारख्या सात नदीमुखांवर धोका असल्याचे स्पष्ट झाले आहे. बेकायदेशीर भू-संपादन, वृक्षतोड, जलप्रदूषण आणि कमजोर अंमलबजावणी यामुळे खारफुटी लोप पावत आहे. विशेषतः वन अधिसूचना नसलेल्या सरकारी जमिनीवरील खारफुटी अधिक असुरक्षित आहे.

आराखड्याचे केंद्रबिंदू म्हणजे खराब झालेल्या खारफुटी भागांचे पुनर्संचयन. मूळ प्रजातींच्या रोपवाटिका विकसित करून, अतिक्रमण थांबवून आणि जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवून संवर्धनाची दिशा आखण्यात आली आहे. खाजन शेती क्षेत्रात खारटपणाची घुसखोरी रोखण्यासाठी पारंपरिक बंधाऱ्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रस्तावही योजनेत आहे.खारफुटीचे कार्बन शोषण सामर्थ्य ओळखून, ब्लू कार्बन' योजनेद्वारे कार्बन क्रेडिट मार्केटमध्ये सहभागाची शिफारस करण्यात आली आहे. यासाठी स्थानिक समुदायांचा सहभाग अनिवार्य मानण्यात आला आहे.

पान २ ▶

### अहवालातील ठळक बाबी

- **खारफुटींचे क्षेत्र धोक्यात : गोव्यातील खारफुटीवर मानवी अतिक्रमण, प्रदूषण आणि हवामान बदलामुळे गंभीर धोका.**
- **डेटामधील मोठी विसंगती : राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील खारफुटी क्षेत्राच्या आकडेवारीत मोठा फरक.**
- **व्यवस्थापन आराखडा सादर : खारफुटीच्या संवर्धनासाठी पुनर्संचयन, कायदेशीर सुधारणा आणि स्थानिक सहभागावर भर**
- **कार्बन क्रेडिटद्वारे निधी संकलन : 'ब्लू कार्बन' प्रकल्पांतर्गत कार्बन ऑफसेटसाठी प्रस्ताव. नवीन सागरी संरक्षित क्षेत्रांची शिफारस : पर्यावरणीय संवर्धनासोबत नियंत्रित पर्यटनाची जोड.**
- **समुदाय सहभाग महत्त्वाचा : महिलांसह स्थानिक समुदायांना रोपवाटिका, इको-टुरिझम उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न.**
- **नवीन कायद्याची गरज अधोरेखित : वन क्षेत्राबाहेरील खारफुटीसाठी स्वतंत्र कायद्याची शिफारस.**